Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यातील स्त्रीविषयक दृष्टिकोन

**प्रा.डॉ. पी.जी. रानमाळ**
मराठी विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय,
जालना.

**प्रस्तावना:**

लेखक रंगनाथ पठारे यांनी त्यांच्या कादंबऱ्यांमधून ग्रामीण, अर्धनागरी, नागरी अशा सगळ्या स्तरावरील मानवी संबंधाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हे जरी खरे असले तरी त्यांच्या कादंबऱ्यांमधील पात्रांची मूळं ग्राम व्यवस्थेतूनच आलेली आहेत. पुढे ती विकसित होत गेलली आहेत. याचे कारण लेखक हे ग्रामीण परिसरात जन्मलेला आहे, तेथेच लहानाचा मोठा झालेले नंतर शिक्षण नोकरी व्यवसायामुळे खेडे तुटले असले तरी तेथील संस्कार मनावर रुजलेले आहेत. त्यांनी खेड्यातील स्त्री पाहिलेली आहे,तिचे जगणे, दु:ख अनुभवलेले आहे. पुढे हा परिघ वाढत गेलेला आहे. लेखक रंगनाथ पठारेंच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन सहानुभावातून, करुणेच्या दृष्टिकोणातून झालेले आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री ही विविध जातीतून चित्रित झालेली आहे. मराठा, कोळी, माळी, साळी, तेली-तांबोळी असा एक स्तर आहे तसेच शिक्षित, नोकरी व्यवसाय, शिक्षण घेणारी, लेखिका तसेच शेती-शेतमजुरी करणारी अशाही स्तरातील चित्रण येते. पठारेंच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन मध्यमवर्गीय आहे. लेखक स्त्रीजीवनाकडे मानवी नात्याच्या संबंधाने पाहतात. अशा नात्यात स्त्री पुरुषांची विविध स्वरुपाची, विविध पातळीवरील नात्यांचा शोध ते मांडतात. लेखक रंगनाथ पठारेंनी 'हारण', 'टोकदार सावलीचे वर्तमान', 'दु:खाचे श्वापद' या तीन कादंबऱ्या 'स्त्री'ला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेल्या आहेत.

**रंगनाथ पठारे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीविषयक दृष्टिकोन**

**'दिवे गेलेले दिवस'-**

रंगनाथ पठारेंची पहिली कादंबरी 'दिवे गेलेले दिवस' यामध्ये मध्यमवर्गीय स्त्रीयांचे जीवन येते. निवेदकामध्ये संघर्षशील वृत्ती असलेली अन्यायाला वाचा फोडण्याचे 'शिस्तपर्वाला' विरोध करणारी लेखनीचे सामर्थ्य ओळखणारी प्रशस्त बाई, ओरिसातील मिस मेहताब, मिसेस देवगिरीकर, निवेदकाची पत्नी या सर्व मध्यमवर्गीय जीवन जगणाऱ्या स्त्रिया आहेत. मानसिक छळाला बळी पडलेली प्रशस्त बाई,

पुरुषावर वर्चस्व लादण्याचा प्रयत्न करणारी, मुत्सद्दीपणा असलेली देवगिरीकर व अतिशय प्रेमळ सांसरिक स्त्री निवेदकाची पत्नी या कादंबरीतून येतात. लेखकाने पुरुषाच्या आधाराने जगणारी मध्यमवर्गीय स्त्री या कादंबरीत अधोरेखित करताना ती भावनाशील वृत्तीची आहे हे विविध कंगोऱ्यातून रेखाटले आहे. 'यावर मात्र ती दुखावली असावी; कारण ती देहाला विपरीत असे उसासे टाकू लागली. तिने तिचे तळवे डोळ्यावर आणले आणि स्फुंदू लागली. फारच विचित्र वाटले'. लेखक रंगनाथ पठारेंनी या कादंबरीतील व्यक्त केलेले हे निवेदनपर मत स्त्रीविषयक करुणेचा, सहानुभूतीचा दृष्टिकोन व्यक्त करणारे आहे.

**'रथ' कादंबरी -**

रंगनाथ पठारेंची 'रथ' ही दुसरी कादंबरी. या कादंबरीमध्ये रावसाहेबांची बहीण सरुबाई, तिची मुलगी जना, शैला कामत, रावसाहेबांची पत्नी विमलबाई व मुलगी उषा इ. स्त्री पात्रे आहेत. रावसाहेबांची बहीण सरुबाई ही ग्रामीण जीवनातील नवऱ्याच्या छळाला त्रासलेली, अशिक्षित, दारिद्र्यात जिणं रेटणारी आहे. ग्रामीण जीवनात स्त्रीचे शोषण होते हे लेखकाने प्रभावीपणे मांडले आहे. शैला कामत ही मध्यमवर्गीय जीवनातील स्त्री, प्रसिद्धीचा हव्यास असलेली नवोदित कवयित्री आहे. रावसाहेबांची पत्नी विमलबाई एक शिक्षिका, आदर्श पत्नी, मध्यमवर्गीय जीवन जगणारी, माणसाचे मन सांभाळणारी आहे तर उषा ही आधुनिक विचाराने भारावलेली नाटकाच्या प्रॅक्टिसला जाणारी कलासक्त मुलगी आहे. रंगनाथ पठारे यांनी ग्रामीण व शहरी यांच्या सीमारेषेवरील स्त्रीची मानसिक आंदोलने अतिशय संवेदनशीलतेने या कादंबरीत रेखाटली आहेत. पठारे याचा एकंदर स्त्रीविषयक दृष्टिकोन सहानुभूतीचाच आहे. लेखक रंगनाथ पठारेंना स्त्रीचे दु:ख पाहून मन विदीर्ण होते. या कादंबरीमध्ये ग्रामीण स्त्रीचे शोषण होते. तिचे जीवन दु:खमय असते हे रावसाहेबांची बहीण सरुबाईच्या संसाराच्या कहाणीतून लेखकाने मांडले आहे.

**'चक्रव्यूह' मधील स्त्रीविषयक दृष्टिकोन :**

रंगनाथ पठारेंची 'चक्रव्यूह' ही तिसरी कादंबरी विद्यापीठीय राजकारण, वातावरण, तेथील व्यवहार तसेच विद्यापीठीय पातळीवरील भ्रष्टाचार, नैतिकतेचे अध:पतन, नीतिमूल्यांचा ऱ्हास यावर आधारित आहे. हा कादंबरीचा एक भाग आहे. दुसरा भाग म्हणजे शंकर सक्सेनाचा जगण्याचा पातळीवरचा एक माणूस म्हणून घेतलेला शोध व त्याच्या मृत्यूचे गूढ हा होय. हा शोध घेत असताना जशी पुरुष व्यक्तित्वे लेखकाने या कादंबरीतून अधोरेखित केली आहेत तशीच श्रीमती सक्सेना, कुलकर्णी मॅडम, मंजुळा सेन, मिस जाखडी या सुशिक्षित उच्च विभूषित स्त्रीया या कादंबरीतून येतात. लेखक रंगनाथ पठारे यांनी या कादंबरीतील जे स्त्रीचित्रण केले आहे ते शिक्षणाच्या निमित्ताने ही मंडळी एकत्र आलेली आहेत. विविध

जातीतील ती आहेत. काहींचा जातीचा तर उल्लेखही नाही. जातीच्या पलीकडे जाऊन त्याच्या जगण्याचा, मानवीपणाचा शोध लेखक घेताना दिसतात.

**'हारण' या कादंबरीमधील स्त्रीविषयक दृष्टिकोन :**

रंगनाथ पठारेंची 'हारण' ही कादंबरी स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेली आहे. 'हारण' ही ग्रामीण दारिद्र्यात जगणारी, जगण्याशी चिवटपणे संघर्ष करणारी, शरीर सौंदर्यवान असल्यामुळे दु:खाचा भोगवटा वाट्याला आलेली 'हारण' आहे. तरीही परिस्थितीवर मात करण्याचा तिचा प्रयत्न आहे. ग्रामीण-अर्धनागरी-महानगरीय असा तिचा प्रवास, त्यातून तिचे परिवर्तनशील जगणे लेखकाने मार्मिकपणे मांडले आहे. 'हारण'च्या स्वभावात चांगुलपणा भरलेला आहे. त्यामुळे ती परिस्थिती आपल्या सोयीचा करण्याचा प्रयत्न करते. ती धाडसी, स्वभावात मार्दवता, कोमलता भरलेली, दु:ख पचवणारी, वेळप्रसंगी 'स्त्रीत्व' वेगळेपण सिद्ध करणारी पण नियतीपुढे हतबल ठरलेली स्त्री लेखकाने या कादंबरीत साकारली आहे. 'हारण'ला तिची सुंदरताच शाप ठरलेला आहे. एकीकडे सर्व गुणांनी सदगुणीपणा हारणमध्ये आहे. तरीही तिच्या वाट्याला जे आयुष्य येते ते दु:खमय असते हे पठारेंनी स्त्रीच्या आयुष्याकडे सहानुभुतीच्या दृष्टीनेच रेखाटले आहे.

लेखक रंगनाथ पठारेंनी 'हारण' या कादंबरीमध्ये स्त्रीच्या अस्तित्वविषयक भूमिकेचा 'हारण' या स्त्री व्यक्तिरेखेच्या अंतर्मनात जाऊन मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. स्त्रीमध्ये उपजतच पुरुषापेक्षा सूज्ञपणा असतो. सुंदर स्त्री ही प्रत्येक पुरुषी नजरेची शिकार होते. स्त्रीमुळेच पुरुषाच्या जीवनात बर्बादी येते हे परंपरावादी विचार लेखक मांडतात तसेच पुरुषाच्या जीवनात यश स्त्रीमुळेच येते. पुरुषाच्या आधाराशिवाय स्त्रीला जगताच येत नाही. पुरुष हा स्त्रीकडे भोगवस्तू म्हणूनच पाहत असतो. हा दृष्टिकोन लेखकाचा या कादंबरीतून अधोरेखित होतो. स्त्रीमन हे अथांग असते. त्याचा थांगपत्ता लागत नाही. एकदा स्त्रीचा पाय घसरला की ती  नैतिकदृष्ट्या अध:पतित होते. सौंदर्य हेच स्त्रीला शाप आहे. 'लई कठीन गं बायी! बायी मान्साचा जन्म लई कठीण!' अश्रू पुसत एक बाई म्हणाली. असा स्त्रीविषयक विचार लेखकाने हारणच्या जीवनातून मांडलेला आहे. 'हारण' ही स्वत:चे सत्त्व टिकवणारी कणखर स्त्री आहे. लेखक रंगनाथ पठारेंनी कादंबरीच्या शेवटी स्त्री चा अस्तित्वविषयक दृष्टिकोन व्यक्त केला आहे.

**'टोकदार सावलीचे वर्तमान' मधील स्त्रीविषयक दृष्टिकोन :**

रंगनाथ पठारे यांची 'टोकदार सावलीचे वर्तमान' ही कादंबरीसुद्धा आई, पत्नी आणि मुली अशा तीन पिढ्यातल्या स्त्रीयांचं चित्रण करणारी व त्यांच्यातील आनुवंशिकतेच्या धाग्याची वीण उकलणारी स्त्रीप्रधान कादंबरी आंहे. प्रोफेसर गजानन भांगरे यांची म्हातारी आई भागीरथाबाई, त्यांची बायको नर्मदा,

त्यांच्या तीन मुली कावेरी, कुमुद व कमल अशा स्त्रीव्यक्तिरेखा या कादंबरीत आहेत. प्रा. भांगरेची आई पंढरपूरच्या अनाथालयातील जीवन जगलेली, पुर्वायुष्यात खूप कष्ट सहन केलेली, पतीही तारुण्यातच वारलेला तरीही सर्व दु:ख सहन करुन मुलाला वाढवणारी व मुलाला स्पर्श करुन जगण्याला ऊर्जा प्राप्त झाल्याचे समाधान शोधणारी आहे. भांगरेची पत्नी नर्मदा ही गावातील उनाडक्या करणाऱ्या मुलाला तारुण्यातच चारित्र्यहननाला फसवली गेलेली त्यामुळे सबंध आयुष्य अश्राप गायीसारखी राहणारी आहे. थोरली मुलगी कावेरी अमरावतीला दारुड्या गोडाऊनकिपर बरोबर संसार करणारी, दु:खित जीवन कंठणारी, सुंदरता, नम्रता या गुणांनी युक्त असलेली सहनशील मुलगी आहे. जळणं हेच तिचं भागधेय बनलेलं आहे. कुमुद ही अतिशय चंचल असलेली, धाडसीवृत्तीची आहे. लेखक रंगनाथ पठारेंनी या स्त्रियांचे चरित्र वर्णन करताना भांगरेची आई पंढरपूरची अनाथालयातील, कुळाचा थांगपत्ता नसलेली तसेच बायको नर्मदा तारुण्यातच दुसऱ्या मुलाच्या वासनेला फसलेली अशी आहे हे शारीरिक गुणसूत्र पुढे त्यांच्या मुलीमध्ये उतरतात, हे या कादंबरीतून अधोरखित केले आहे. 'स्त्री'चे मूळ जेनेटिक गुणधर्म बदलू शकत नाही. विशिष्ट काळातील स्त्री व पुरुष यांची शारीरिक धर्म कितीही, कधीही दाबले, तरी ते दबू शकत नाहीत, हेही पठारेंनी यातून अधोरेखित केले आहे.

**'ताम्रपट' या कादंबरीमधील स्त्रीविषयक दृष्टिकोन :**

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारे यांची इ.स.१९४२ ते १९७९ पर्यंतचा विशेषत: महाराष्ट्राचा राजकीय व सामाजिक जीवनपट विस्ताराने व समर्थपणे मांडणारी कादंबरी आहे. अर्थात पुरुष व्यक्तिरेखांना या कादंबरीत महत्त्वाचे स्थान आहे. 'ताम्रपट' कादंबरीमध्ये अठरापगड जातीतल्या स्त्रिया आहेत. एकूण एकवीस स्त्रीया कादंबरीतून लेखकाने चित्रित केल्या आहेत. स्वातंत्र्यासाठी गोळ्या झेलणारी रणरागिणी, विधवापन सोसणारी आवडाबाई कोष्ठीण, तिची मुलगी लीला ही आंतरजातीय विवाह करणारी व अनाथ मुलांना शिकवणारी, उच्चविद्याविभूषित इंदिराराजे देशमुख या पुरुषाच्या कर्तृत्वात सिंहाचा वाटा असलेली प्रसंगी धूर्त, खानदानीपणा व संधीसाधूपणा भरलेला तसेच पुरुषावर छाप पाडणारी धूर्त राजकारणी स्त्री आहे. अनुताई सिरुर आदर्श गृहिणी, सोज्ज्वळपणा व पतीला धीराने साथ देणारी स्त्री आहे. गोधाबाई पाटलीन ही शेतकरी कुटुंबातील स्त्री मराठा कुटुंबातील आहे. बोलण्यात गावंढळपणा असला तरी दु:खावर मात करणारी आहे. लेखक रंगनाथ पठारे यांच्या 'ताम्रपट' या कादंबरीमध्ये विविध जातीतील स्त्रीव्यक्ती रेखाटल्या आहेत. पण त्यापलीकडे स्त्री ही हळवी, कोमल आहे तशीच ती दु:खावर मात करणारी, विधवापन विसरुन धाडसाने आयुष्याला सामोरे जाणारी आहे. अर्थात या कादंबरीमध्ये स्त्रीव्यक्ती रेखाटत असताना

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

विधवा स्त्रियांच्या चित्रणात लेखकावर हरिभाऊ आपटेंचा प्रभाव जाणवतो. लेखकाने अतिशय कारुण्यपूर्णतेने, सहानुभूतीच्या वृत्तीतून स्त्री जीवनाकडे पाहिलेले दिसते.

**'दु:खाचे श्वापद' या कादंबरीमधील स्त्रीविषयक दृष्टिकोन :**

'दु:खाचे श्वापद' ही रंगनाथ पठारे यांची कादंबरी उल्हासबाई चत्तर या 'स्त्री'ची करुण कहाणी मांडणारी आहे. उल्हासाबाई हिच या कादंबरीच्या रचनेच्या केंद्रस्थानी आहे. म्हणून ही स्त्रीप्रधान कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये समाजसेविका श्रीमती गोपाळे, उल्हासबाई चत्तर, उल्हासबाईची आई, प्रा.वालझाडेंची पत्नी, मुलगी शालिनी, धनंजय वालझाडेंची भाजीवाली प्रेयसी, नरसाळे पाटील यांची पत्नी तसेच बलुची स्त्री अशा स्त्री व्यक्तिरेखा आहेत. श्रीमती गोपाळे ह्या समाजसेविकाचे काम करणाऱ्या, काहीतरी मिळवण्याची धडपड असणाऱ्या अशा आहेत. समाजसेवेचे काम हा निव्वळ देखावा आहे. त्यातून ऊर्जा घेऊन स्वत:चे भले करुन घेणारी मुत्सद्दी स्त्री आहे. वालझाडेची मुलगी ही मऊ स्वभावाची आहे. सुरुवातीला स्वप्नाळू जीवन जगणारी पण जसजसे आयुष्य कळू लागल्यावर अनुभवाने शहाणपण येणारी मुलगी होय.

**'नामुष्कीचे स्वगत' मधील स्त्रीविषयक दृष्टिकोन :**

रंगनाथ पठारेंची 'नामुष्कीचे स्वगत' ही एक प्रायोगिक कादंबरी आहे. कादंबरी रचनेची मोडतोड करणारी आहे. तिचे स्वरुप 'निवेदनरुप' आहे. निवेदक हा संवेदनशील असा लेखक आहे. माणसाच्या मनात अनेक गोष्टी चाललेल्या असतात. मन हे चंचल असते. मनाचा संबंध संवेदनशीलतेशी आहे. अशा संवेदनशीलतेत अनेक गोष्टी येतात. या संवेदनशीलतेचाच एक भाग म्हणून या कादंबरीत घटनाच्या संबंधाने काही स्त्री पात्रे आलेली आहेत. निवेदकाच्या मनातून निर्माण झालेले अप्रत्यक्षी स्वरुप या पात्रांचे आहे. निवेदकाच्या स्वगताला एक माध्यम म्हणून ही पात्रे आलेली आहेत. स्त्री - पुरुष नात्यामध्ये संबंधाचे स्वरुप कपड्याच्या चिरगुटासारखे बनत आहे. स्त्रीमुक्तीचा उलट अर्थ निर्माण होतो आहे. मुक्ती म्हणजे कुठलेही बंधन नाही. मुक्तीचे रुपांतर स्वैराचारात होते आहे. हा स्त्रीमुक्तीसंबंधीचा स्त्रीविषयक दृष्टिकोन यातून व्यक्त होतो. स्त्रीया या सोशीक असतात हे अर्धसत्यच आहे, हाही विचार हा निवेदक व्यक्त करतो. भारतीय स्त्री ही इथल्या पुरुषाप्रमाणे जबाबदारवृत्तीची असते. इतर देशातल्या स्त्रीयांप्रमाणे पुरुषाचा ती तिरस्कार करत नाही हा भेदही हा निवेदक व्यक्त करतो. यातूनच लेखकाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन व्यक्त होतो. थोडक्यात, 'नामुष्कीचे स्वगत' या कादंबरीमधून भारतीय स्त्रीमधील सुसंस्कृतीप्रवणता, विदेशी स्त्रीमुक्ती चळवळ ही भारतीय परंपरेत रुजताना स्त्रीमुक्तीच्या नावाखाली स्वैराचारवृत्ती वाढते.

**समारोपः**

रंगनाथ पठारेंच्या स्त्री व्यक्ती रेखाटनाची मूळं ग्रामीणतेत रुजलेली असल्यामुळे परंपरेला ठोसपणे ती नकार देताना दिसत नाहीत. ती बंडखोर नाही. दु:ख सोसणारी, कुंठित जीवन जगणारी, उच्चविद्याविभूषित असली तरी पुरुषाशिवाय ती स्वतंत्रपणे स्वत:चे अस्तित्व घेऊन उभी राहताना दिसत नाही. 'हारण' दुष्काळी प्रदेशात राहून पुढे मुंबईपर्यंत जीवनप्रवास करते. परंतु प्रत्येक टप्प्यावर पुरुषाचाच आधार घेत असते. 'टोकदार सावलीचे वर्तमान' मध्ये सुद्धा 'पुरुष' प्रवृत्तीच्याच त्या बळी आहेत. 'ताम्रपट' मध्ये तर पुरुषाचा एक धागा म्हणून त्या आलेल्या आहेत. 'दु:खाचे श्वापद' मधील उल्हासबाई पुरुषी वासनेचा बळी आहे. लेखकाचा 'स्त्री'कडे पाहण्याचा दृष्टिकोन कारुण्यपूर्णतेचा, सहानुभूतीपूर्वकच त्यांच्या कादंबऱ्यांमधून आविष्कृत होताना दिसतो आहे. लेखक स्त्रिव्यक्तीरेखां संबंधाने म्हणतात "बंड करणाऱ्या, परिस्थितीवर स्वार होण्याची धमक प्रकट करणाऱ्या स्त्रीया या कादंबऱ्यात अभावानेच दिसतात. पुरुषाची स्खलनशीलता मी जितक्या सहजपणे घेतो तितकी सहज स्त्रीची मला घेता आलेली नाही. ती तशी होऊ लागली की लगेच मी स्पष्टीकरणाचं पाठबळ उभ करु पाहतो. यापाठीमागे माझ्या नकळत एक सहानुभूतीचा दृष्टिकोन असतो. हीन नैतिकतेची स्त्री मला सहजपणे चितारता आलेली नाहीये. ही काही बरं वाटावं अशी गोष्ट नाही. कळत नकळत मी स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचं माणूस मानत नाही असाच याचा अर्थ होतो. या स्पष्टीकरण प्रवृत्तीपाठी एक एकांगीपण, एक नासमझीच आहे. लेखक रंगनाथ पठारेंनी स्त्री व्यक्तिरेखेसंदर्भात मांडलेली भूमिका महत्त्वपूर्ण आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतून याचा प्रत्यय येतो.

**संदर्भः**

- पठारे रंगनाथ : 'आस्थेचे प्रश्न', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. २०००
- पठारे रंगनाथ : 'टोकदार सावलीचे वर्तमान', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. १९९८
- पठारे रंगनाथ : 'दिवे गेलेले दिवस', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, द्वि.आ. २०००
- पठारे रंगनाथ : 'दु:खाचे श्वापद', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, ति.आ.१९९९
- पठारे रंगनाथ : 'सत्वाची भाषा', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. १९९७
- पठारे रंगनाथ : 'हारण', मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९०
- बागले प्रभाकर : 'निमित्ताच्या निमित्ताने', साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ.१९९८